# महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न – अभ्यासातून निष्कर्ष

**डॉ. कोळसेकर मनोहर सुबराव,** विभाग प्रमुख इतिहास विभाग,
टी.के.कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नेसरी ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
manoharkolasekar@gmail.com

---

**प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर काळात भारत या देशात जी आंदोलने झाली, चळवळी झाल्या त्या पैकी 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि सीमा लढा, या दोन महत्वाच्या घटना होय.

अगदी सुरूवातीच्या काळापासून भाषाही जनतेच्या वांशिक गटाला किंवा समाजाला एकत्र करते. भाषा ही मानवी परस्पर संबंधाचे साधन आहे. विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीत स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचनेची मागणी पुढे आली. संस्थाने खालसा झाली. भाषा, प्रशासकीय सोय, लोकमानस या त्रिसूत्रीच्या आधारे भारतात विविध राज्ये अस्तित्वात येऊ लागली. भाषावार प्रांतरचना करण्यासाठी आयोग नेमला गेला. त्याच्या अहवालानुसार १ नोव्हेंबर ,१९५६ रोजी राज्यपुनर्रचना अस्तित्वात आली. त्यावेळी महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारण्यात आले. तसेच बेळगाव, कारवार इत्यादी जिल्हयांचा मराठी भाषिकांचा सीमाभाग महाराष्ट्राला न जोडता म्हैसूर (कर्नाटक) राज्यात अन्यायाने घालण्यात आला आणि महाराष्ट्रात एकच वादळ उठले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी 'संयुक्त महाराष्ट्र एकीकरण समिती अस्तित्वात आली. या लढयासाठी लेखक, कलावंत, सामान्य लोक वर्तमानपत्रकर्ते, सामाजिक संघटना, राजकीय पक्ष या सर्व घटकांनी फार मोठे योगदान दिले आहे. १०५ हुतात्म्यांच्या बलीदानावर १मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. पण शेवटी २५ लाख लोकसंख्या मराठी भाषीकांचा प्रदेश तसाच कर्नाटक राज्यात राहिला. त्यामूळे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती पूर्ण होवू शकली नाही. बेळगांव, निपाणी, खानापूर, कारवार बीदर, भालकी या सीमा प्रदेशातील मराठी भाषीक लोक गेली बासष्ट वर्षे मरण यातना भोगत आहेत. हा सीमा प्रश्न सोडवण्यासाठी लोकविचाराच्या चळवळीचे अनेक मार्ग हाताळण्यात आले. संपापासुन सत्याग्रह, आमरण उपोषनापर्यंत बहिष्कारापासून निषेध, मोर्चा पर्यंत शिष्ठमंडळापासुन हौतात्म पत्करण्यापर्यंत चळवळीचे सारे मार्ग हाताळण्यात आले. लोकशाहीच्या मार्गाद्वारे साऱ्या निवडणुकाही जिंकून या भागावरील मराठी जनतेचे असलेले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले तरी ही केंद्र शासनाने या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले नाही.गेल्या ६३ वर्षात या भागातील मराठी संस्कृती नष्ट करण्याचा चंग बांधलेले कर्नाटक सरकार, हा प्रश्न पुरेसा गांभीर्याने न घेणारे महाराष्ट्र शासन आणि केवळ बघ्याची भूमिका घेणारे केंद्र सरकार अशा कात्रीत येथील मराठी भाषिक जनसमुदाय सापडला आहे. तरीही गेल्या ६४ वर्षाहून अधिक काळ मराठी जनतेने धीर आणि संयम न सोडता, अखंडपणे सनदशीर आणि लोकशाही मार्गाने हा लढा 'महाराष्ट्र एकीकरण समितीच्या' नेतृत्वाखाली धगधगता ठेवला आहे.

सीमाभागात अडकलेल्या मराठी भाषिकांची यातून सुटका करून घेण्यासाठी एकजूटीने सातत्याने प्रयत्न करत आहेत पण त्याना यश येत नाही, म्हणून मराठी भाषिक जनता सर्वोच्च न्यायालयात न्यायाची याचना करत आहे.

**चंद्रचूड समितीची स्थापना**

सीमाप्रश्नासाठी लोकशाही मार्गाने अनेक चळवळी झाल्या. तरीदेखील सीमाप्रश्न न सुटल्याने या प्रश्नासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याचा मतप्रवाह पुढे येऊ लागला. १९९५ मध्ये खानापूर तालुका महाराष्ट्र एकीकरण समितीने सीमाप्रश्नासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करावी अशा आशयाचा ठराव सर्वप्रथम पास केला. त्याला मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीनेही जोड देऊन त्याचा पाठपुरावा केला व वेळोवेळी महाराष्ट्र शासनाला निवेदने दिली. तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी, शरद पवार, प्रा. एन. डी. पाटील, प्रा. मधु दंडवते, राम कापसे यांची सर्वपक्षीय उच्चाधिकार समिती या प्रश्नासंदर्भात नियुक्त करण्याचा निर्णयदेखील दि. १४ नोव्हेंबर, १९९६ रोजी घेण्यात आला. या समितीने वेळोवेळी बैठका घेऊन सीमाप्रश्नाच्या सोडवणुकीवर विचारविनिमय केला. कर्नाटक आपला हट्ट सोडावयास तयार नाही. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न हा न्यायालयात जाण्यास योग्य प्रकरण आहे का

याचा अभ्यास करण्यासाठी ४ नोव्हेंबर, १९९६ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री. वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रचूड समितीची स्थापना करण्यात आली.' त्यामध्ये श्री. व्ही.टी. वालावलकर व श्री. व्ही. आर. भंडारे हे सदस्य होते.

**सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल**

चंद्रचूड समितीने कायदेशीर बाबींचा अभ्यास करून सीमाप्रश्नी सर्वोच्च न्यायालयात जाण्यास वाव असल्याचा २४ नोव्हेंबर, १९९७ रोजी अहवाल दिला. त्यानुसार पंचसदस्य समितीने सीमाप्रश्नी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा महाराष्ट्र सरकारला सल्ला दिला. ६ नोव्हेंबर, २००२ मध्ये सीमाप्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयात कर्नाटक व केंद्र शासनाविरुद्ध भारतीय राज्यघटनेच्या कलम १३१ अन्वये याचिका दाखल करण्याची उच्चाधिकार समितीची शिफारस करण्यात आली. त्यानुसार १२ एप्रिल, २००३ मध्ये महाराष्ट्र मंत्रीमंडळाची बैठक झाली. बैठकीत शासनाचा खालील निर्णय घेण्यात आला.

१.कर्नाटक व केंद्र शासनाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करावी.

२. या याचिकेसंदर्भात सल्ला देण्यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमावी.

३. पुरावे जुळवाजूळव व मांडणीसाठी व समन्ययासाठी विशेष कार्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

दि. ३ मार्च, २००३ मध्ये मंत्रिमंडळ निर्णयानुसार प्रा. एन. डी. पाटील व मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ॲड. भांडारे आणि ॲड. वालावलकर यांची तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आली आणि त्यानुसार **२९ मार्च, २००४ मध्ये भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १३१ (ब) अन्वये केंद्र शासन व कर्नाटक राज्य यांना प्रतिवादी करून त्यांच्याविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात आला.** (दावा क्र. ४/२००४)

दै . तरुण भारत ( बेळगांव ) चे सामाजिक , राजकीय , शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान (१९१९ ते १९८० ) या विषयावर संशोधन करत असताना महाराष्ट्र-कर्नाटक सीमालढ्याशी संबंधित माहिती दै. 'तरुण भारत' या वृत्तपत्रातून संकलित केली आहे . तसेच सीमालढ्याशी संबंधित नेत्याच्या मुलाखती घेतल्या, त्याचबरोबर दुय्यम संदर्भ साधनसामग्रीच्या आधारे माहिती संकलित केली आहे. त्या माहितीचे विविध निकषांच्या आधारे वर्गीकरण करून त्या आधारे वास्तव असे निष्कर्ष मांडले. तरीपण एक संशोधक म्हणून या विषयावर अभ्यास केल्यानंतर ज्वलंत सीमाप्रश्नाच्या विरोधात महाराष्ट्राने भारत सरकार आणि कर्नाटक सरकार यांच्या विरोधात २००४ साली सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला. या दाव्याचा निकाल लागेपर्यंत सिमावासियांच्यासाठी काही सूचना व शिफारशी सरकारला सुचवाव्या वाटल्या. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**सूचना व शिफारशी**

१. महाराष्ट्र सरकारने व महाराष्ट्र एकीकरण समितीने सीमालढ्यासंदर्भात अद्ययावत माहिती देणारे संकेतस्थळ (वेबसाईट) सुरू करावी. ज्यामुळे सीमालढ्याचा इतिहास, मराठी भाषिकांची गळचेपी व त्यांचा लढा इ. बाबतची परिपूर्ण माहिती मराठी, कन्नड , हिंदी व इंग्रजी भाषेतून दिल्यास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरून सीमालढ्याला पाठबळ मिळेल.

२. महाराष्ट्र एकीकरण समिती ही मराठी भाषिकांची मुख्य संघटना असून या समितीचे मध्यवर्ती स्वतंत्र कार्यालय असावे.

३. सरकारी कार्यालयामधील, शैक्षणिक संस्थांमधील बस गाड्यावरील गावच्या नावांचे फलक हे मराठी व कन्नड अशा दोन्ही भाषेतून असावेत.

४. महाराष्ट्र सरकारने व महाराष्ट्रातील विविध राजकिय पक्षानी केवळ औपचारिकता म्हणून सिमा प्रश्नाकडे न बघता, केवळ सिमा प्रश्नाचा राजकारणासाठी वापर न करता प्रबळ राजकिय इच्छाशक्तीद्वारे केंद्र सरकारवर दबाव आणावा . सिमाप्रश्नाबाबत महाराष्ट्रातही लोकलढा उभाकरून हा प्रश्न तात्काळ सोडवून घ्यावा.

५. बदलत्या परिस्थितीत हुतात्म्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी मराठी भाषिकांनी संघटित होण्याची गरज आहे. मराठी भाषिकातील दुहीचा लाभ उठविण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकारचा आहे. त्यामुळे सीमाप्रश्न सुटण्याच्या दृष्टीने

प्रगती न होता एक पाऊल मागेच पडले आहे. ते पुढे कसे न्यायचे हे महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांनी एकत्र येऊन निर्णय घेण्याची गरज आहे.

६. न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत सीमाभाग केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करावा.

७. महसूल विभागातील सर्व कागदपत्रे मराठी व कन्नड भाषेतून असावीत.

८. सीमाभागातील मराठी ग्रामीण साहित्य संमेलनांना महाराष्ट्र सरकारकडून भरीव आर्थिक मदत करण्यात यावी. जेणेकरून ग्रामीण साहित्य संमेलनांना चालना मिळून मराठी भाषा व संस्कृतीचे संवर्धन होईल.

९. महाराष्ट्र सरकारने १० वी पर्यंतच्या क्रमिक पाठ्यपुस्तकामध्ये सीमालयावरील लेख, पाठ, कविता सामील कराव्यात. जेणेकरून नवीन पिढीला ही माहिती होण्यास मदत होईल.

१०. कर्नाटक सरकारने इयत्ता १० वी पर्यंतच्या क्रमिक पाठ्यपुस्तकामध्ये महाराष्ट्रीय भाषा, संस्कृती विषयीच्या अभ्यासक्रमाचा समावेश करावा.

११. कर्नाटक सरकारने सीमाभागातील गावामध्ये वीज, पाणी, रस्ते इ. विकासात्मक योजना राबवाव्यात.

१२. कर्नाटक सरकारने मराठी भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचे व अधिकारांचे भारतीय राज्यघटनेतील तरतुदीप्रमाणे रक्षण करावे,

१३. मराठी माध्यमाच्या शाळा बांधकाम दुरूस्ती याकडे कर्नाटक सरकारने सकारात्मक दृष्टीने पाहावे.

१४. मराठी भाषिक म्हणून कर्नाटक पोलिसांनी ज्या खोट्या केसेस दाखल केलेल्या आहेत त्या काढून घ्याव्यात. तसेच पोलिसांकडून भाषिक दृष्टिकोणातून होणारा छळ थांबवावा.

१५. कर्नाटक सरकार व विकास प्राधिकरणांकडून (बुडा, केआयडीबी) मराठी भाषिकांच्या जमिनी जबरदस्तीने संपादन करण्यात येऊ नयेत.

१६. एकेकाळी महाराष्ट्र एकीकरण समिती देईल तो माणूस आमदार व्हायचा. आता कोणीही उठतो आणि हे उमेदवार समितीचे आहेत, असे जाहीर करतो. खानापूर, उत्तर बेळगाव, दक्षिण बेळगाव, बेळगाव ग्रामीण, निपाणी आणि कारवार असे विधानसभेसाठी सहा मराठी मतदारसंघ आहेत. यातील निपाणी, कारवार वगळता आजही मराठी मतांची एकी झाली तर चार मराठी आमदार निवडून येऊ शकतात.

१७. कर्नाटक सरकारने मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पुरेसा शिक्षकवर्ग नेमावा.

१८. सीमाप्रश्नावर आधारित महाराष्ट्र सरकारने माहितीपट काढावा.

१९. मराठी साहित्यिकांनी सीमालढ्यावर कथा, लेख, कादंबऱ्या, कविता, नाटक लिहून समाजजागृतीचे काम करावे. जेणेकरून सीमाग्रस्त भागाकडे प्रसारमाध्यमांचा आणि प्रशासनाचा दृष्टिक्षेप बदलण्यास मदत होईल.

२०. सीमालढ्यातील गोळीबारात जखमी झालेल्या मराठी भाषिकांना महाराष्ट्र सरकारकडून आर्थिक मदत मिळावी. तसेच हुतात्म्यांच्या वारसांना भरीव स्वरूपाची मदत देण्यात यावी.

२१. पोस्ट, रेल्वे, बँका, विमा इ. केंद्रीय कार्यालयातील कागदपत्रांची भाषा मराठी व कन्नड असावी.

२२. सीमाप्रश्नी महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे. या दाव्यात राष्ट्रीय मानव अधिकारी आयोगासही प्रतिवादी करून घेण्याच्या दृष्टीने हालचाली झाल्या पाहिजेत. कर्नाटक सरकार सीमाभागातील मराठी जनतेवर करीत असलेल्या अन्याय आणि अत्याचाराची चौकशी मानव अधिकार आयोगाकडून केली जाऊ शकते. व या आरोपामध्ये आयोगाला तथ्य आढळल्यास आयोग तसा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर करू शकतो.

२३. महाराष्ट्र -कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदावरील नियुक्तीबाबत घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी करावी.

२४. केंद्र सरकारने आशा सिमा तंट्यात व भाषिक संघर्षाकडे दूर्लक्ष न करता लोकशाहीच्या संवर्धनाकरिता, बळकटीकरणाकरीता व विकासाकरिता तात्काळ प्रयत्न करावेत अन्यथा अशा प्रश्नांना वेळेत न्याय नाही, मिळाल्यास लोकशाहीवरचा विश्वास उडेल.

संशोधकाला महाराष्ट्र-कर्नाटक सीमालढ्यामध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीची भूमिका या विषयावर अभ्यास करीत असताना वरील निष्कर्ष आढळून आले आहेत. या निष्कर्षांवरून पुढील सूचना करण्यात आल्या आहेत. या सूचनांची अंमलबजावणी महाराष्ट्र एकीकरण समिती, महाराष्ट्र शासन, कर्नाटक सरकार व केंद्र सरकार यांनी करून सीमावासियांना योग्य तो न्याय मिळवून द्यावा.

**संदर्भ साधने**

१. दै. तरुण भारत, बेळगाव, १९४६ ते २००६.

२. दै. बेळगाव समाचार, बेळगाव, १९४६ ते २००६.

३. राष्ट्रवीर, बेळगाव, १९४६ ते २००६.

४. दै. केसरी, पुणे, १९४६ ते २००६.

५. बेळगाव सहकार दर्शन, मराठी शब्द सोहळा, १०वा वर्धापन दिन, दिवाळी विशेषांक.

६. माजी आमदार श्री. व्ही. वाय. चव्हाण अमृतमहोत्सव गौरव विशेषांक.

७. वेणुनाद, स्मरणिका, ७३वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बेळगाव २८ एप्रिल, २०००,नियतकालिक

८. संग्राम (मासिक), जाधव एम. व्ही. शासकीय कुटीर, डॉ. व्ही. व्ही. राव मार्ग नरिमन पॉईंट मुंबई

९. माळी भरतभूषण शमशोन 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ एक ऐतिहासिक अभ्यास', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पीएच्. डी. (इतिहास) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, २०१२.

१०. कोळसेकर मनोहर सुबराव'दाजीबा देसाई व्यक्ती व कार्य', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, एम्.फिल्. (इतिहास) पदवीसाठी सादर केलेला लघुप्रबंध, २००८.

११. कोळसेकर मनोहर सुबराव 'दै . तरुण भारत ( बेळगांव ) चे सामाजिक , राजकीय , शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान' (१९१९ ते १९८० ) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे शोधप्रबंध, २०१५

१२. चौगुले एल.आर, 'असा लढा असे लढवय्ये' राज्ञी प्रकाशन, बेळगाव -२०००

१३. साने रविकिरण 'लढा संयुक्त महाराष्ट्राचा' डायमंड पब्लिकेशन्स पुणे , २००९

१४. मेणसे कृष्णा 'आमी लढलो आमी घडलो' लोकवांड;मयग्रह, मुंबई , २००३